**<u>सांगोला येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात</u>**

**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २३/२०२२ मधील नि. २७ खालील आदेश</u>**

(हफीजा शेख विरुध्द शफुद्दीन मुजावर व इतर)

<u>CNR NO. MHSO-2000-0079-2022</u>

प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १० यांचे विरुध्द पारीत झालेला दावा अबेट करण्याचा आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार, दाव्याचे काम चालू असताना दि. ३०/०९/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १० वकील उस्मान मुजावर हे मयत झाले आहेत. कोरोना कालावधीमुळे प्रतिवादी क्र. १० चे वारस मुदतीत अभिलेखावर आणता अले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १० विरुध्द दावा अबेट करण्यात आला आहे. सदरचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास वादीचे नुकसान होणार आहे. करीता वादीने सदरील अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १० विरुध्द दावा अबेट करण्याचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १३ विरुध्द अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

४. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ६ ते ८ तर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादीचे कथन की, नि. २५ वरती दिलेले म्हणणे याकामी समजणेत यावे. तसेच प्रतिवादी क्र. ११ यांनी नि. ३१ ला दिलेले म्हणणे याकामी वाचण्यात यावे अशी विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जावर दोन्ही पक्षातर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेचा दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी मयत प्रतिवादी क्र. १० यांचे बाबत दावा अबेटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसेच अर्जात नमूद केलेले कारण पाहता वादीस

मयत प्रतिवादी क्र. १० यांचे विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द करुन घेण्यास झालेला विलंबासाठी खर्चाचा आदेश करणे योग्य होणार नाही. सबब, खालील आदेश करण्यात येते.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज (नि. २७) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १० यांचे विरुध्द झालेला दावा अबेट करण्याचा आदेश रद्द करण्यात येतो व दावा पुनर्जिवीत करण्यात येतो.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2025.04.05 17:45:31 +0530

सांगोला. (सौ. बी. एम. पोतदार)

दिनांक: २९/०३/२०२५. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar, Civil Judge, J. D.& J. M. F. C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 29.03.2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 05.04.2025 |